## महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ बैठकीचे इतिवृत्त दि.१६/११/२०१८

| अ. क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | शासन परिपत्रक दि.१४/११/२०१७ शासन आदेश डावलून मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक पदी दिलेल्या पदोन्नती तात्काळ रद्द कराव्यात. | कोल्हापूर जिल्हयामध्ये ५४ व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ९ कर्मचाऱ्यांना दि.१४/११/२०१७ चे शासन आदेश डावलून पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. कोल्हापूर व सिंधुदुर्ग तसेच इतर जिल्ह्यामध्ये दि.१४/११/२०१८ चे शासन आदेश डावलून दिलेल्या पदोन्नतीबाबतचा विषय दि.३०/११/२०१८ रोजी जिल्हा स्तरावर होणाऱ्या संघटना बैठकीमध्ये ठेवावा. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) स्तरावर | -- |
| २ | बेकायदेशीर रोखलेल्या वेतनवाढी पूर्ववत सुरु करणेबाबत. अन्याय करणाऱ्या संस्था व मुख्याध्यापक यांचेवर कारवाई करणेबाबत | या प्रकरणी शिक्षण उपसंचालक कार्यालयात सुनावणी घेवून संबंधितांना निर्णय कळविण्यात आलेले आहे. | -- | -- |
| | अ) सौ. अमृता अरविंद दळवी, सौ सिमरण समीर चांदरकर. | | | |
| | ब) सौ. देवयानी धनंजय गावडे वराडकर, हायस्कूल कट्टा. ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग | | | |
| ३ | सेवाज्येष्ठता डावलून दिलेली मुख्याध्यापक पदेन्नती तात्काळ रद्द करणेबाबत.<br>श्री. संजय श्रीधर अग्निहोत्री, वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कट्टा, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग. | श्री. संजय श्रीधर अग्निहोत्री, वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कट्टा, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील मुख्याध्यापक मान्यतेबाबत तपशिलवार अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करावा. तसेच दि. ३०/११/२०१८ रोजी जिल्हा स्तरीय आयोजित करण्यात येणाऱ्या संघटना बैठकीमध्ये हा विषय घेण्यात यावा. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. सिंधुदुर्ग | -- |
| ४ | कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग व श्री संजय श्रीधर अग्निहोत्री, वराडकर हायस्कूल व ज्यु. कॉलेज, कट्टा, ता. मालवण यांनी कर्मचाऱ्यांवर चालविलेल्या मानसिक, आर्थिक त्रासाबाबत संस्थेवर प्रशासक नियुक्ती करणेबाबत. | कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग वर प्रशासक नियुक्तीबाबत संचालनालय स्तरावरुन दि. १२/१२/२०१४ च्या पत्रानुसार सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.सिंधुदुर्ग यांनी याबाबत चौकशी करुन प्रशासक नियुक्तीबाबत तपशिलवार अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शिक्षण उपसंचलाक कार्यालयास पाठवावा. अहवाल प्राप्त होताच संचालनालयास सादर करण्यात येईल. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सिंधुदुर्ग | तात्काळ |
| ५ | श्रीम. स्नेहासिनी सिध्दार्थ तांबे, सहा. शिक्षिका, वराडकर हायस्कूल व ज्यु. कॉलेज, कट्टा, ता. | या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सिंधुदुर्ग यांनी तपशिलवार चौकशी करुन योग्य तो निर्णय घ्यावा. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सिंधुदुर्ग | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मालवण या मागासवर्गीय महिलेवर चालविलेल्या अन्याय (निवडश्रेणी न देणे, पदोन्नती न देणे) विरुध्द तात्काळ दखल घेवून अन्याय दुर करणेबाबत. | | | |
| ६ | कळे विद्यामंदीर, कळे, ता. पन्हाळा या शाळेत नियम डावलून दिलेली पदोन्नती (पर्यवेक्षक) तात्काळ रद्द करणेबाबत. | या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. कोल्हापूर यांनी चौकशी करुन फेरनिर्णय घ्यावा. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. कोल्हापूर | -- |
| ७ | मे. शाळा न्यायाधिकरण कोल्हापूर १४/२०१६, ४९/२०१७ अपिल प्रलंबित असताना दिलेली पदेन्नती तात्काळ रद्द करणेबाबत (दुधसाखर विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालय, ब्रिद्री मौनीनगर, कागल) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. कोल्हापूर यांनी मे. शाळा न्यायाधिकरण कोल्हापूर येथे १४/२०१६, ४९/२०१७ हे अपिल प्रलंबित असताना दिलेली पदोन्नती मान्यतेबाबतच्या प्रकरणांची पुनर्तपासणी करुन शासनाच्या प्रचलित धोरणानुसार निर्णय घ्यावा. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. कोल्हापूर | -- |
| ८ | शासन निर्णय दि. १३ मार्च २०१८ नुसार कोल्हापूर विभागामध्ये १ जून २०१८ ते आजअखेर किती ज्यु. कॉलेजच्या शिक्षणसेवक व सहा. शिक्षकांना मान्यता दिलेली यादी मिळणेबाबत. | संघटनेस यादी उपलब्द करुन देणेत यावी. | उच्च माध्य. शाखा. शि.उ.सं. कार्यालय | -- |
| ९ | न्यु एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर या संस्थेच्या रोष्टरबाबत मा. विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे दि. २१/१०/२०१७ नुसार आपल्या कार्यालयाने कोणती कार्यवाही ठेवलेली आहे. | या प्रकरणी प्रशासन अधिकरी, मनपा आयुक्त यांचेकडून अहवाल मागविणेत येईल. | शि.उ.स. कार्यालय | -- |
| १० | प्राथमिक शिक्षण समिती मनपा, कोल्हापूर कडे शासनमान्य पदावर आजअखेर (स्थापनेपासून) अनु. जाती प्रवर्गातील पद न भरलेबाबत कार्यवाही करणेबाबत. | या कार्यालयातील अखत्यारितील विषय नसून आयुक्त, महानगरपालिका, कोल्हापूर यांच्या आखत्यारितील विषय आहे. | -- | -- |
| | **आयत्या वेळचे विषय :-** | | | |
| १ | श्री. बी.बी.खरात वैयक्तिक मान्यतेबाबत. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सांगली यांनी वैयक्तिक मान्यता देणेबाबत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवही करावी. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सांगली | -- |
| २ | महात्मा गांधी विद्यालय, पुसेसावळी, सातारा या शाळेच्या मुख्याध्यापक पदास दिलेल्या मान्यतेबाबत. | महात्मा गांधी विद्यालय, पुसेसावळी, सातारा या शाळेच्या मुखाध्यापक पदास दिलेल्या मान्यतेबाबत तपशिलवार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सातारा यांनी चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. सातारा | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | थकित देयकांबाबत. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी थकित देयकांचे प्रस्ताव दि.२७/११/२०१८ पर्यंत शिक्षण उपसंचलाक कार्यालयाकडे सादर करावे. शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून दि. ३०/११/२०१८ पर्यंत सर्व प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात येतील. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

**शिक्षण उपसंचालक**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**